**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सच्या दरात १९५ रुपये वाढ/ घरगुती वापराच्या सिलेंडरच्या दरात बदल नाही

- महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरणाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- खरीप हंगामासाठी पुरेसा साठा करता यावा, या दृष्टीने नियोजन करण्याचे कृषीमंत्र्यांचे कृषी विभागाला निर्देश

- समृद्धी महामार्गावर जालना जिल्ह्यात झालेल्या अपघातात सहा महिलांचा मृत्यू, दोन जण जखमी

**आणि**

- राज्यातल्या विविध भागात वादळी पाऊस आणि गारपिटीचा इशारा/ १० जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेल विपणन कंपन्यांनी देशातल्या महानगरांमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे दर वाढवले आहेत. त्यामुळे व्यावसायिक वापरासाठीचे १९ किलो वजनी सिलिंडर्स आता दिल्लीत २ हजार ७८ रुपये ५० पैसे, तर मुंबईत २ हजार ३१ रुपये दराने मिळेल.

घरगुती वापराच्या सिलेंडर्सच्या दरात काहीही बदल झालेला नाही.

विमानासाठी वापरल्या जाणाऱ्या टर्बाईन इंधनाच्या दरात साडेआठ टक्के वाढ झाली असून, देशी कंपन्यासाठी ते दिल्लीत २ लाख ७ हजार रुपये प्रति किलोलीटर दराने तर मुंबईत १ लाख ९४ हजार रुपये, दराने मिळेल. परदेशी विमान कंपन्यांसाठी ही इंधन दरवाढ १०० टक्के करण्यात आली आहे.

जेट इंधनाच्या दरात अंशतः आणि टप्प्याटप्प्याने वाढ केल्यामुळे प्रवाशांना त्याचा तीव्र फटका बसणार नाही, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवरन प्राधीकरणाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजूरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली. या अंतर्गत राज्यातल्या ५४ नदी प्रदुषित पट्ट्यांबाबत पुरूज्जीवन प्रकल्प राबवले जाणार आहेत. प्राधिकरण या ५४ प्रदूषित नदी पट्टयांसाठी पुनरूज्जीवनासाठी टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम निश्चित करेल. विविध योजनांचं एकत्रिकरण करून पूरक धोरणांची म्हणजेच सांडपाणी प्रक्रिया, औद्योगिक सांडपाण्या संबंधात उपाययोजना, अतिक्रमणं रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी प्राधीकरण शिफारस करेल. त्याचप्रमाणे अंमलबजावणीसाठी विविध विभागांदरम्यान समन्वय साधेल तसंच जनजागृती, लोकसहभाग वाढवण्यासाठी आराखडे तयार करेल. प्राधिकरणासाठी आवश्यक २ हजार कोटींचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यास तसंच शासनाचे योगदान म्हणून १०० कोटींचा निधी देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातल्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी एक हजार २३४ कोटी रुपयांच्या तरतुदीला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. याचा लाभ

३२ अवर्षणग्रस्त गावांना  होणार आहे.  राज्यातल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणं तसंच भूमि अभिलेख विभागात 'भूकरमापक' पदाऐवजी परिरक्षण भूमापक पदाला मान्यता देण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

**<><><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्याचे निर्देश आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. महात्मा फुले यांचं द्विशताब्दी जयंती वर्ष साजरं करण्यासाठी गठीत समितीमध्ये संलग्न असलेल्या विभागाने किमान दोन ते तीन कार्यक्रमांचं आयोजन करावं, असे निर्देशही त्यांनी दिले.

**<><><><><><>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या रुपे ऑन द गो, एनसीएमसी सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं. विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास सुलभ करण्याच्या उद्देशाने या कार्ड योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसंच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरित केलं जाणार आहे.

**<><><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामासाठी एप्रिल आणि मे महिन्यातच खतांचा पुरेसा साठा करता यावा, या दृष्टीने कृषी विभागानं काटेकोरपणे नियोजन करावं असे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत.  खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर

राज्यातली खतांची उपलब्धता आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. युध्दजन्य परिस्थितीत खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होवू नये यासाठी कृषि विभाग योग्य ती  काळजी घेत असून, रासायनिक खतांवरचं अवलंबित्व कमी करण्यावर, आणि जैविक खतांचा वापर वाढवण्यावर भर दिला जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><><>

समृद्धी महामार्गावर एका पिकअप वाहनाला जालना जिल्ह्यात कडवंची शिवारात पाठीमागून भरधाव आलेल्या कंटेनरने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात सहा महिला ठार झाल्या. तर चालकासह अन्य एकजण जखमी झाला. ही दुर्घटना संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमाराला घडली. पिकअप वाहनात असलेले सर्वजण बदनापूर तालुक्यातल्या खादगाव आणि केळी गव्हाण इथले मूळ रहिवासी असून समृद्धी महामार्गांवर काम करणारे मजूर होते, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

<><><><><><>

राज्यातल्या शहरी  आणि ग्रामीण भागातल्या शासकीय जमिनीवरची १ जानेवारी २०११ पर्यंतची पंधराशे चौरस फुटांपर्यंतची बांधकामं नियमित केली जाणार असल्याची माहिती महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. या आधी ही मर्यादा केवळ ५०० चौरस फुटांपर्यंत होती. जनतेच्या हितासाठी मालमत्तेच्या दरात १२ ते १४ टक्क्यांपर्यंतची दरवाढ नाकारण्यात आल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांची जमीन मोजणीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी भूमी अभिलेख विभागातर्फे 'व्हर्जन २' हे नवीन सॉफ्टवेअर लाँच केले जात असल्याची माहितीही त्यानी दिली. शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी असलेल्या पांदण रस्त्यांबाबतही कडक भूमिका घेण्यात आली असून कोणी सार्वजनिक रस्ता

अडवल्यास त्याचे सरकारी योजनांचे ओळखपत्र पाच वर्षांसाठी रद्द केले जाणार असल्याचंही त्यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागरच्या किनाऱ्यावर आजपासून कासव महोत्सवाला सुरुवात झाली असून, तो संपूर्ण एप्रिल महिनाभर सुरू राहणार आहे. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाईस कास्ट कोनकर**

**<><><><><>**

अहिल्यानगरच्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पार्टीनं दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचा मुलगा अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. त्याच्या नावाची आज घोषणा करण्यात आली. शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी गारांचा पाऊस पडेल असा अंदाज आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजी नगर, जालना आणि बीड या जिल्ह्यांमध्ये उद्या पाऊस आणि गारपिटीची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**

इंडीयन प्रिमियर लिग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. लखनऊ इथं

थोड्याच वेळात या सामन्याला सुरूवात होईल. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

भोंदू बाबा अशोक खरातला नाशिक सत्र न्यायालयानं आज १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली. खरातवर अनेक गुन्हे दाखल झाले असून १४ मार्चला त्याला प्रथम अटक केली होती.

**//<><><><><><>//**